# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने आयआरबी कंपनीच्या २१ ठिकाणावर टाकलेल्या छाप्याबाबत

**(१) ८२८६ (०६-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई मार्गावरील जमिनी हडपल्याच्या आरोपावरून वादाच्या भोव-यात अडकलेल्या आयआरबी कंपनीच्या २१ ठिकाणावर केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापे टाकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर छाप्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या अखत्यारीतील केंद्रिय अन्वेषण विभाग (सी.बी.आय.) मार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

---

### मौजे पात्रेवाडी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथे यात्रेदरम्यान झालेली विषबाधा

**(२) २५६८८ (०६-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पात्रेवाडी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथे यात्रेदरम्यान ८८ जणांना विषबाधा होऊन ४० जण अत्यवस्थ असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) सिद्धनाथ देवाची यात्रा सुरु असताना देवाचा प्रसाद खाल्यामुळे ३६ लोकांना अस्वस्थ वाटू लागल्यामुळे त्यांना ग्रामिण रुग्णालय आटपाडी येथे उपचारासाठी ॲडमीट केले व इतर लोकांना पात्रेवाडी ता. आटपाडी येथे ॲडमीट केले.
(२) देवाचा प्रसाद घेतल्यामुळे हा प्रकार घडला असल्यामुळे कोणाविरुध्द काही तक्रार नाही असे लोकांनी सांगितले आहे. त्यामुळे सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झालेला नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

## मौ.नागोठाणे (जि.रायगड) शहरातील शांतीनगर परिसरामधील चोऱ्याप्रकरणी तपास करण्याबाबत

**(३) २६७७१ (१२-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. नागोठाणे (जि.रायगड) शहरातील शांतीनगर परिसरात दिनांक १३ व १४ जानेवारी, २०१५ रोजी एकाच दिवशी झालेल्या ११ दुकान / घर / ऑफीस मध्ये घडलेल्या चोऱ्याप्रकरणी तपास पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१८) :** (१) दि.१३ व १४ जानेवारी, २०१५ रोजी मौ.नागोठाणे (जि.रायगड) शहरातील शांतीनगर परिसर येथे सहा दुकाने व एका रहात्या घरातून एकूण ३६,३५०/- रुपये किंमतीचा माल चोरीस गेला आहे. तसेच दोन ऑफीस, दोन दुकाने, एक घर येथे चोरीचा प्रयत्न झालेला आहे. सदर गुन्ह्याबाबत नागोठाणे पोलीस स्टेशन गु.र.नं.०३/२०१५, भादविसं.कलम ४५७, ३८० प्रमाणे एकत्र एकच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) घटनास्थळावरुन अंगुलीमुद्रातज्ञांना हाताचे ठसे मिळून आले नाहीत, श्वान यशस्वी होवू शकला नाही, संशयीत आरोपींच्या घराची झडती घेण्यात आल्यानंतर काहीही मिळून आले नाही तसेच घटनेत चोरीस गेलेले सिमकार्ड बंद आढळून आले.

तपास पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने उपयुक्त पुरावे मिळून न आल्याने गुन्ह्याचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, रोहा यांच्या मार्फत गुन्हा निरंतर तपासावर ठेवण्यासाठी मा.न्यायालयाकडे सादर केले असता, "अ" वर्ग समरी मंजूर करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत**

**(४) २९७७५ (२१-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलातील ४० वर्षावरील अधिकारी व कर्मचा-यांची आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असल्याचे तसेच मुंबईतील नागपाडा पोलिस रुग्णालय येथे साधने व सुविधा पुरविण्याबरोबरच या रुग्णालयाच्या अधिपत्याखालील १२ पोलीस रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यात येणार असल्याचे मा.आराग्यमंत्री यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास जाहिर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय, ४५ वर्षे व त्यावरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करणेबाबत सूचना दिल्या आहेत.
(२) दिनांक २७.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्यावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची सन २०१७-१८ मध्ये वैद्यकीय तपासणी करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी यांची ११ पदे भरण्यात आली असून १ पद रिक्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील लष्कर परिसरामध्ये समाजकंटकांनी केलेली**
**दगडफेक व पोलीसांनी केलेल्या लाठीमाराबाबत**

**(५) ३३३४० (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील लष्कर परिसरामध्ये दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी काही समाजकंटकांनी केलेली दगडफेक आणि लोधी व मोची समाजातील निरपराध लोकांवरील पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठीमाराची सखोल चौकशी करून दोषी पोलीस अधिकारी व

कर्मचारी यांच्यावर कारवाई होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घटनेबाबत सदर बाजार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गु.र.नं. ३१९/२०१५ भा. दं. वि. कलम १४३, १४७, १४८ ,१४९, ३५३, ३३२, ३३६, ३३७, १०९ सह मुंबई पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सोलापूर शहरात जमावबंदीचा आदेश लागु असतांना राजकीय वैमनस्यातुन बेकायदेशीररित्या लोक एकत्र जमुन एकमेकांवर दगडफेक करत असतांना पोलीसांनी त्यांना शांततेचे आवाहन केले, परंतु जमावातील लोकांनी पोलीसांवर दगडफेक सुरू केली त्यात ७ पोलीस अधिकारी/कर्मचारी जखमी झाले. या प्रकरणी परिस्थिती नियंत्रणात आणण्याकरिता सौम्य बळाचा वापर पोलीसांना करावा लागला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील फ्लेवर्ड सिगारेट्सच्या वाढत्या तस्करीबाबत**

**(६) ४०००३ (२०-०५-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) ने गत काही महीन्यात केलेल्या कारवायांमध्ये ५० कंटेनर भरुन तस्करी केलेल्या फ्लेवर्ड सिगारेट्सचा साठा जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंडोनेशिया, मलेशिया, चीन व दुबई देशांमध्ये बनलेल्या या सिगारेट थेट भारतात येत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर फ्लेवर्ड सिगारेट्सच्या महिला स्मोकर्सचे प्रमाण वाढले असल्याचेही आढळले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सिगारेट्सच्या होणाऱ्या तस्करीला प्रतिबंधित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१८) :** (१) राज्यात डीआरआय ने गत काही महिन्यात केलेल्या कारवायांमध्ये ५० कंटेनर भरून तस्करी केलेल्या फ्लेवर्ड सिगारेट्सचा साठा जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

परंतु पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या कार्यक्षेत्रात गुप्त बातमीच्या आधारे कारवाई करण्यात आली आहे.
(२) राज्यात पोलीस आयुक्त, नागपूर शहर/ नाशिक शहर/नागपूर शहर/पोलीस अधीक्षक, नांदेड/पालघर यांच्या कार्यक्षेत्रात, इंडोनेशिया या देशामधील देशांतील सिगारेट थेट भारतात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) विदेशी सिगारेट व तंबाखुच्या पाकीटांवर सचित्र वैधानिक इशारा नसणा-या आणि भारतात विक्री होत असलेल्या बेकायदेशिर उत्पादनांवर कारवाई करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दि. २१.०४.२०१७ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

---

**भोसी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अवैध दारु विक्रीचे धंदे बंद करण्याबाबत**

**(७) ४१३४८ (१७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे गत अनेक वर्षापासून सुरु असलेले अवैध दारु विक्रीचे धंदे बंद करण्यात यावे यासाठी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील अवैध दारु विक्रीचे धंदे बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय.
सदर प्रकरणी भोसी ता. औंढा जि. हिंगोली या गावातील ग्रामसेवक व इतरांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे अवैध दारु विक्रीचे धंदे बंद करण्याबाबत निवेदन दिले आहे.
(२) सदर भागात अवैध दारु विक्री करणारे इसमांविरुध्द वेळोवेळी कारवाई करुन पोलीस स्टेशन औंढा येथे ०५ गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन त्यामध्ये ०३ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून एकूण २५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, जिल्हाभरात ऑपरेशन क्राक डाऊन यासारख्या मोहिमेअंतर्गत व एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**उरण भेंडखळ येथील बीपीसीएल कंपनीत असलेल्या प्रोपेन व बुटेन साठविण्यासाठी असणाऱ्या टाकीतून गळती होत असल्याबाबत**

**(८) ४२३५८ (२४-०५-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण भेंडखळ (जि.रायगड) येथील बीपीसीएल कंपनीत असलेल्या प्रोपेन व बुटेन साठविण्यासाठी असणाऱ्या ८००० मेट्रीक टन क्षमतेच्या दोन टाक्यांपैकी एका टाकीतून गळती होत असून उक्त ठिकाणी गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने येथील श्रमजीवी पत्रकार संघटनांनी यासंदर्भात उरण तहसिलदार व उरण पोलिस ठाणे यांच्याकडे तक्रार दाखल केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर टाकीची दुरुस्ती बीपीसीएल कंपनीतर्फे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड यांनी बीपीसीएल उरण या कंपनीत प्रोपेन व बुटेन साठविण्यासाठी असणाऱ्या ८००० मेट्रीक टन क्षमतेच्या दोन टाक्यांपैकी टाकी क्र.१ चे अमेरिकन तज्ञांमार्फत देखभालीचे काम सुरु आहे व टाकी क्र.२ मध्ये ०६ कि.ग्रॅ/सेमी. या प्रेशरचे -४ अंश से. चे ब्युटेन द्रावण साठविलेले आहे. सदर टाकीचे डिझाईन आंतरराष्ट्रीय मानक एपीआय ६२० कोड नुसार केली आहे. सदर टाक्या उभारण्यापुर्वी स्फोटक नियंत्रक कार्यालयाकडून मंजुरी घेतली असून टाक्यांच्या सुरक्षिततेसाठी सेफ्टी रिलीफ व्हॉल, व्हेपर रिलीफ व्हॉल, वॉटर स्प्रिंक्लर, फ्लॅश क्रम्प्रेसर तसेच टाक्यांमधील निरोपयोगी गॅस जाळून टाकण्यासाठी फ्लोअर सिस्टीम व गॅस लीक डिटेक्टर यंत्रणा बसवलेली आहे. सदर यंत्रणा २०१२ पासून कार्यरत असून त्यांची वेळोवेळी पाहणी केली जात असल्याने अद्याप पर्यंत कोणतीही दुर्घटना झालेली नाही. सदर बाब अध्यक्ष, श्रमजीवी पत्रकार संघटना यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंबरे (पागे) (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील अवैध धंदे बंद करण्याबाबत**

**(९) ४२४४१ (१७-०५-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरे (पागे) (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील अवैध धंदे बंद करण्याबाबत ग्रामपंचायतीच्या ठरावासह अर्ज, विनंत्या तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देऊनही अवैध धंदे बंद केले जात नसल्याने ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उंबरे येथील अवैध धंदे कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) व (२) उंबरे (पांगे) ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील चोरुन चालणाऱ्या अवैध धंद्यांवर सन २०१४ ते मे २०१६ अखेरपर्यंत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| **प्रकार** | **सन** | **एकूण केसेस** | **आरोपी** | **जप्तमाल (रु.)** |
|---|---|---|---|---|
| दारुबंदी | २०१४ | ११ | ११ | ४४०८/- |
| | २०१५ | १२ | १२ | ७३४२/- |
| | मे २०१६ | ०५ | ०५ | ३८३७/- |
| जुगार | २०१४ | ०१ | ०५ | १३०/- |
| | २०१५ | ०२ | ०३ | ८२०४/- |
| | मे २०१६ | - | - | - |

सदर ठिकाणी चोरुन चालणाऱ्या अवैध धंद्यावर कारवाई करण्यात आली असून सध्या सदर गावात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालू नसल्याचे तेथील सरपंच व उपसरपंच यांनी दि.२६/०२/२०१६ पत्रान्वये पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांना कळविले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**बोरीवली येथील एक्सर रोड, देवीदास लेन, एलआयसी कॉलनी आणि देवकीनगर जंक्शनचा चौकात गतिरोध नसल्याने होणाऱ्या अपघाताच्या दुर्घटना**

**(१०) ४६३७९ (१७-०५-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली येथील एक्सर रोड, देवीदास लेन, एलआयसी कॉलनी आणि देवकीनगर जंक्शनचा चौकात अपघाताच्या दुर्घटना होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकातील परिसरात रेयॉन इंटरनॅशनल स्कुल, सेंट लॉरेन्स स्कुल या इंग्रजी माध्यमाच्या शाळांसह निवासी संकुले असून ट्रॅव्हल्स, शाळांच्या बसेस, रिक्षा खासगी वाहने यांची वर्दळ असल्याने दुर्घटनांना टाळण्यासाठी तेथे गतिरोधक उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीकडे संबंधित प्रशासन दुर्घटनांना करित आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वाहतूक जंक्शनवर सिग्नल तसेच वाहतूक बेट बनविण्याबाबत अभिप्राय मिळण्याकरीता पोलीस विभागास प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यास अनुसरुन सेंट लॉरेन्स शाळेसमोरील चौकाची पाहणी करुन नमूद चौकात वाहतूक बेट अथवा सद्य:स्थितीत सिग्नल बसविता येणे शक्य नसल्याबाबत वाहतूक विभागाने अभिप्राय दिले आहेत. मात्र शालेय विद्यार्थी तसेच पालक व जेष्ठ नागरीक यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक पोलीस मुख्यालयाकडून देवीदास लेन दक्षिण उत्तर वाहिनी, वामन चौगुले मार्ग, आय.सी. कॉलनी या ठिकाणी गतीरोधक उभारण्यासंदर्भात मंजूरी देण्यांत आलेली असून तशी शिफारस करण्यांत आलेली आहे.

नमूद चौकात रात्रीच्या वेळी कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून हायमास्ट लँपची व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे नमूद परिसरात अपघाताच्या दुर्घटनांना आळा बसावा याकरीता बोरीवली वाहतूक विभागाकडून कार्यरत अधिकारी व रायडर्स यांची गस्त वाढविण्यांत आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक शहरात वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतुक यंत्रणा प्रभावाहीन झाल्याबाबत

**(११) ४६६२६ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात वाहतूक यंत्रणा प्रभावी असूनही शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे तसेच वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ही यंत्रणा प्रभावाहीन होऊन अपघातामध्येही वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाहतूकीमध्ये रुग्णवाहिकेनांही वाट काढणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर वाहतूक पोलिस जिवाच्या भितीने कारवाईही करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक शहरातील वाहतूक समस्या सोडविण्याकरिता तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शहरातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे ही बाब खरी असून त्या तुलनेत अपघातांच्या प्रमाणात घट झालेली आहे. वाहनचालकांनी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात वाहन चालविल्यामुळे अपघात झाल्याचे दिसून येते.

(२) रुग्णवाहिका ही अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने त्यांना शहर वाहतूक शाखेच्या मदतीने मार्ग मोकळा व सुरळीत करुन देण्यांत येतो. तसेच रस्त्यावरील वाहनचालकसुध्दा आपले वाहन बाजूस घेऊन रुग्णवाहिकेस मार्ग मोकळा करुन देत असतात.

(३) हे खरे नाही.

(४) राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व नाशिक महानगरपालिका यांचेकडे आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरीता पाठपुरावा करण्यांत येतो. तसेच नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाकडून वेळोवेळी मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई चालू असते.

नाशिक शहर वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटर वाहन कायद्यान्वये पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| वर्ष | दाखल केसेस | तडजोड शुल्क बसूल (रु.) |
|---|---|---|
| २०१४ | १,४६,४५४ | १,५५,०५,८०० |
| २०१५ | १,२५,५४५ | १,३१,५८,४०० |
| मे, २०१६ पर्यंत | ९३,४१९ | ९९,३१,९०० |

यावव्यतिरिक्त मा.न्यायालयामार्फत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे

| वर्ष | खटले दाखल | दंड आकारणी (रु.) |
|---|---|---|
| २०१४ | ११६३ | २०,४४,७०० |
| २०१५ | १५७ | ३,०३,५५० |
| मे, २०१६ पर्यंत | ३३१ | ४,९९,१०० |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे खाजगी सावकारीतून पोलीस कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याबाबत

**(१२) ४७७९५ (२७-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे खाजगी सावकारीतून पोलीस कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ च्या अखेरीस घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात खाजगी सावकारीतून जीवघेणी वसूली, अवाजवी व्याज, कर्जदारास मारहाण/धमकावणे अशा अनेक घटना निदर्शनास येत असून केवळ २२१ सावकारांचीच नोंदणी शासनाकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खाजगी सावकारीच्या घटनांना पायबंद करण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दि.१३/११/२०१५ रोजी इचलकरंजी पोलीस ठाण्यातील पो.कॉ. इम्रान दिलावर याने आत्महत्या केली आहे. तथापि, इम्रान याने कोणीतरी अज्ञाताकडून घेतलेले पैसे फेडता न आल्याने आत्महत्या केल्याचे चौकशीमध्ये आढळून आले आहे. मयताच्या मृत्युबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याने मयताची गळफास लावून मृत्यु अशी अखेर समरी उपविभागीय दंडाधिकारी, इचलकरंजी यांनी जा.क्र. मयत/समरी/एसआर/ ४९५/२०१७ दि.२०/०७/२०१७ अन्वये मंजूर केली आहे.

(२) खाजगी सावकारीतून जीवघेणी वसूली, अवाजवी व्याज, कर्जदारास मारहाण/ धमकावणे वगैरे तक्रारी प्राप्त होताच तक्रारीची दखल घेऊन संबंधित पोलीस ठाणेकडून खाजगी सावकारांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(३) कोल्हापूर जिल्हयातील पोलीस ठाणेत खाजगी सावकारांच्या विरूध्द तक्रार दाखल झाल्याने खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करून खाजगी सावकारांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

| **अन.नं** | **सन** | **दाखल गुन्हे** |
|---|---|---|
| १. | २०१५ | २ |
| २. | २०१६ | १२ |
| ३. | सन २०१७ माहे सप्टेंबर अखेर | १ |

जिल्ह्यातील पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांना अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच तात्काळ दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**संजीवनी आरोग्य योजना ही संस्था बेरोजगारांकडून नोकरीकरीता**
**सिक्युरीटीच्या नावाने आर्थिक फसवणुक करीत असल्याबाबत**

**(१३) ५०६२४ (११-०५-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजीवनी आरोग्य योजना ही संस्था बेरोजगारांकडून नोकरीकरीता सिक्युरीटीच्या नावाने फसवणुक करुन पैसे गोळा करीत असल्याची तक्रार सदर मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) व (२) सदर संस्थेने नवाकाळ या वृत्तपत्रात गोवा केंद्र शासनाचे संजीवनी आरोग्य योजने अंतर्गत विविध पदासाठी भरती करायची आहे. अशी बनावट जाहिरात देवून तरूणांना नोकरीने आमिष दाखवून, बनावट कागदपत्र तयार करून एका महिलेची रूपये १६,०००/- इतक्या रक्कमेची फसवणूक केली आहे. या प्रकरणी मनमाड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७१/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

यावयतिरिक्त राज्यात संजीवनी आरोग्य योजना या संस्थेने बेरोजगारांकडून नोकरी करिता सिक्युरिटीच्या नावाने फसवणूक करून पैसे गोळा करित असल्याचे आढळून आले नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

## मिरज (जि.सांगली) तालुक्यातील काही गावांमध्ये अवैध धंदे सुरू असल्याबाबत

**(१४) ५२०८९ (२०-०५-२०१६). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाला, बेडग, अरग, मालगाव, बेळंगी (ता.मिरज, जि.सांगली) या गावामध्ये मटका, गावठी दारू विक्री, जुगार आदी अवैद्य धंदे सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत गावामध्ये अपुरी पोलीस यंत्रणा असल्यामुळे अवैध धंद्यांना प्रतिबंधीत करणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशनमध्ये कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) म्हैशाळ, बेडग, आरग, मालगाव, बेळंकी वगैरे गावात सन २०१५ ते सन २०१६ माहे मे अखेर केलेल्या अवैध धंद्याविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कारवाई चा प्रकार | माहे मे २०१६ अखेर | | | माहे मे २०१५ अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केसेस उघड करीस | अटक आरोपींची संख्या | जप्त मालाची किंमत | केसेस उघड कीस | अटक आरोपींची संख्या | जप्त मालाची किंमत |
| १ | अवैध मटका जुगार | २२ | ३७ | ३७२९१/- | ०५ | ०७ | ४३४१९/- |
| २ | अवैध दारु | - | - | - | - | - | - |

माहे मे २०१५ ते माहे मे २०१६ या तत्सम कालावधीत अवैध धंदयाच्या कारवाईत (+१५) वाढ झाली आहे.

(२), (३) व (४) मिरज ग्रामीण पोलीस ठाणेस पोलीस बल मंजुरीनुसार लक्षात घेवून मंजूर संख्याबळाची परिपूर्ण पुर्तता होईल याकडे लक्ष पुरविण्यात आले आहे.

मिरज ग्रामीण पोलीस ठाणेसह जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाणेस मंजूर संख्याबळातुन उपलब्ध पोलीस बलाच्या मदतीने सर्व क्षेत्रावर प्रभावी कार्य राहील याद्दष्टीने निरंतर प्रयत्न केले जात आहेत.

---

**अहमदपूर (जि.लातूर) येथून नवी मुंबईकडे जात असलेली कलापथकाची गाडी मांजरा नदीत कोसळून झालेला अपघात**

**(१५) ५३९९२ (२४-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील कार्यक्रम आटोपून नवी मुंबईकडे जात असलेली कलापथकाची तवेरा गाडी मांजरा नदीपात्रात कोसळून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.०२.०५.२०१६ रोजी रात्री ११.३० चे सुमारास कलापथक नागठाणा येथून एरोली, नवी मुंबईकडे जाण्यास निघाले असता महापुर जवळील मांजरा नदीवरील पुलावर दि.०३.०५.२०१६ रोजी पहाटे ०२.०० वा. गाडीचालकास अचानक झोप लागल्याने सदर गाडी पुलावरुन खाली पडली. यामध्ये चालकासहीत ४ जण ठार झाले असून वाहनातील इतर ४ जण जखमी झाले आहेत. मयतांना गंभीर जखमा झाल्याने मरण आल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

या अपघाताबाबत पोलीस ठाणे रेणापूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०२/१६, भा.दं.वि.कलम २७९, ३०४(अ), ३३७, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव बॉम्बस्फोट प्रकरणातील बेपत्ता असलेल्या आरोपी च्या कुटुंबियास अर्थसहाय्य देण्याबाबत

**(१६) ५४९७२ (२३-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस दहशतवाद विरोधी (एटीएस) पथकाच्या काही अधिकाऱ्यांनी, सन २००८ च्या मालेगांव बॉम्बस्फोट प्रकरणात इंदूर येथील बंगाली चौकातील दिलीप पाटीदार यास चौकशीसाठी दिनांक ११ नोव्हेंबर, २००८ पासून ताब्यात घेतले तेव्हा पासून ते बेपत्ता असल्या प्रकरणी, मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दोन एटीएसच्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन आरोपीच्या मुलांचे शिक्षण आणि पालनपोषणासाठी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी दिलीप पाटीदार यांच्या पत्नीने, मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २० मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन बेपत्ता दिलीप पाटीदार यांचा शोध घेण्याबाबत या प्रकरणातील दोषी एटीएसच्या अधिकाऱ्याविरुध्द शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच पाटीदार कुटुंबियांना अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुध्द सीबीआय विशेष न्यायालय, इंदौर येथे खटला चालू असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील नागपूर-औरंगाबाद या मुख्य महामार्गावरील अपघातांना प्रतिबंधीत करण्याबाबत

**(१७) ५५०७९ (२३-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील नागपूर-औरंगाबाद या मुख्य महामार्गावर सन २०१५ ते एप्रिल, २०१६ पर्यंत ५३ अपघात झाले असून त्यात ३५ जणांचा मृत्यू व ४८ जण जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावरील अपघात रोखण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) सन २०१५ ते एप्रिल, २०१६ या कालावधीत मेहकर शहरातील नागपूर-औरंगाबाद या मुख्य महामार्गावर बुलढाणा जिल्हा हद्दीत एकूण ५१ अपघात झाले असून त्यात ३३ जणांचा मृत्यु व ६० जण जखमी झाले आहेत.

(२) बुलढाणा जिल्ह्यात अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊ नये याकरीता रस्तेदुरुस्ती, दिशादर्शक फलक लावणे, वाहतूक पॉईंट, सिग्नल यंत्रणा, स्टॉप लाईन, गतिरोधक टाकणे, पांढरे पट्टे, झेब्रा क्रॉसिंग, साईड पार्किंग इ. कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद, म.रा.रस्ते विकास महामंडळ इ. यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द वेळीच कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉम्रेड पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(१८) ५५४३२ (२३-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉम्रेड पानसरे यांच्या हत्या होऊन तीन वर्ष झाली तरी आरोपींना अटक करण्यात आली नसल्याने तपासाबाबत संशय व्यक्त करण्यात येत असून त्यांच्या कुटूंबियांनी नाराजी व्यक्त केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीबाय) पथकाने दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुणे आणि पनवेल येथील सनातन संस्थेच्या साथकांच्या घरांवर सीबीआयने टाकलेल्या छापाच्या कारवाईत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, आरोपींना पकडण्यात शासनास अपयश आल्याने लोकांच्या मनामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून तपास यंत्रणेतील अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच तपासातील प्रगतीचे स्वरुप काय असून सदर प्रकरणातील आरोपींना अटक करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१), (२), (३) व (४) डॉ.नरेंद्र दाभोळकर हत्या संदर्भात डेक्कन पो.स्टे. येथे गु.र.नं.१५४/२०१३, भा.द.वि. कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका (PIL) क्र.४४/२०१३ (नवीन क्र.७/१४) वर दिलेल्या आदेशानुसार सदर खुनाचा तपास दि.२/०६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आला.

कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या हत्त्या संदर्भात राजारामपुरी पोलीस ठाणे, गु.र.नं.३९/२०१५, भादवि सं. कलम ३०२, ३०७,१२०(ब), ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, ५/२७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करुन मा.न्यायालयात त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. उर्वरित दोन आरोपींचा कसोशीने शोध घेण्यात येत असून त्यांच्याविरुध्द रेड कॉर्नर नोटीस लागू करण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर कामी नियुक्त एस.आय.टी. मार्फत सी.आर.पी.सी. १७३(८) प्रमाणे चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींना राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) दोषमुक्त केल्याबाबत

**(१९) ५५५५९ (२३-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) बॉम्बस्फोट प्रकरणाचा दहशतवाद विरोधी पथकाचे हेमंत करकरे यांच्या काळात योग्य तपास झाला असून सदर तपासच चुकीचा असल्याचे दाखवून मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींना राष्ट्रीय तपास यंत्रणांने (एनआयए) दोषमुक्त केल्याचे माहे मे, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी भक्कम पुरावे असतांना संशयितांना दोषमुक्त करण्याच्या निर्णयास निधर्मी संघटनेने विरोध करुन जनआंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या निर्णयाबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१), (२) व (३) दहशतवाद विरोधी पथकाने सदर गुन्ह्यास मोक्का कायद्याच्या तरतुदी लागू करुन एकूण १२ आरोपींना अटक करुन मोक्का न्यायालयात दोषारोप पत्रे दाखल केली आहेत.

सन २०११ मध्ये सदर गुन्हे पुढील तपासाकरीता एनआयएकडे वर्ग करण्यात आला असून दि.१३/०५/२०१६ रोजी एनआयएने नमूद गुन्ह्यात पुरवणी दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

मोक्का कोर्टाने एनआयएच्या अहवालानंतर कोणत्याही आरोपीस गुन्ह्यातून दोषमुक्त केलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांडवगण फराटा (ता.शिरुर, जि.पुणे) येथे उघड्या असलेल्या बोअरवेलमध्ये पडून बालकाचा मृत्य झाल्याबाबत**

**(२०) ५५६३५ (१०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांडवगण फराटा (ता.शिरुर, जि.पुणे) येथे उघड्या असलेल्या बोअरवेलमध्ये पडलेला सुनिल मोरे याला ३१ तासाच्या अथक प्रयत्नातूनही त्याला जिवंत बाहेर काढण्यासाठी बचाव पथकाला यश आले नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उघडी पडलेली बोअरवेल व बुजवणारा बोअरवेल मालक व खोदाई करणारा कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मांडवगण फराटा येथील शेतीमालक नवनाथ शितोळे यांनी त्यांचे शेतात बोअर घेतले होते. परंतु सदर बोअरला पाणी लागले नसल्याने तो बोअर बंद न करता व त्यास केसिंग पाईप न बसविता उघडा ठेवल्याने त्यामध्ये त्यांचेच शेतात काम करणाऱ्या मजूराचा सुनिल मोरे हा ४ वर्षीय मुलगा दि.३०.०४.२०१६ रोजी पडून गुदमरुन मयत झाला.
शेतमालक नवनाथ शितोळे यांनी शेतातील बोअर उघडा ठेवून सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली नाही म्हणून त्यांचेविरुध्द शिरुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६६/२०१६, भादंवि कलम ३०४ (अ) अन्वये गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.
सदरचा बोअर खाजगी शेतमालकाचे शेतात घेतलेला होता, त्यामुळे प्रथमदर्शनी कंत्राटदाराचा त्यामध्ये दोष आढळून आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे व नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीला भीषण आग लागल्याबाबत**

**(२१) ५५६८० (२४-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहा मजली प्रशासकीय इमारतीला भीषण आग लागून प्रशासकीय कार्यालयासह, साहित्य आणि विश्रामगृह जळून खाक झाल्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०१६ रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेतील भ्रष्टाचार प्रकरणामुळे सदर घातपात घडवून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १७ एप्रिल, २०१६ रोजी धुळे शहरातील शिवाजी रोडवरील धुळे-नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य इमारतीच्या तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या माळयास आग लागली होती. अग्नीशमन दलाच्या सहाय्याने सदर आग विझवण्यात आली होती. या आगमध्ये बँकेचे सुमारे दिड ते दोन कोटी रुपयांचे नुकसान झालेले असून कोणत्याही प्रकारची जिवितहानी झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

आगीच्या घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आलेला आहे. आगीची घटना ही भ्रष्टाचार प्रकरणामुळे झाली आहे अगर कुणी घातपात घडवून आणल्याची बाब चौकशीत निष्पन्न झालेली नाही.

(३) सदरची आग ही शॉर्ट सर्किटमुळे लागलेली असावी असे विद्युत निरीक्षक, म.रा.वि.वि.कं. लि., धुळे यांच्या अहवालात नमूद आहे. सदर घटनेसंदर्भात धुळे शहर पोलीस ठाणे येथे अग्नी उपद्रव रजिस्टर नंबर ०२/२०१६ अन्वये दिनांक १७.०४.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे बेलोरा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील गोठ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याबाबत

**(२२) ५५७४७ (२३-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बेलोरा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील गोठ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने एक रेडकू, दोन बकऱ्या व दोन घरे बेचिराख होऊन ७ लाखाचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्तांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) मौजे बेलोरा ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील एकूण चार इसमांच्या घराला व एका गोठ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागून त्यामध्ये एक रेडकू, दोन बकऱ्या, घरगुती सामान व एका घरातील कापूस जळून नुकसान झाले आहे.
(२) होय.
(३) या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलीसांनी स्टेशन डायरीत क्र.१८/२०१६, दि.२६.०४.२०१६ प्रमाणे नोंद घेऊन चौकशी केली असता सदरची आग शॉटसर्किटमुळे लागल्याने घराचे व गोठ्याचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

लागलेल्या आगीतील नुकसानी संदर्भात संबंधितांना तहसिलदार दर्यापूर यांचेमार्फत रु. १,४६,७५०/- इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवासला धरणातून दौंड आणि इंदापूरला सोडण्यात आलेल्या पाण्यात बुडून बहिण भावाचा झालेला मृत्यु

**(२३) ५६१८७ (२३-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला धरणातून दौंड इंदापूरला सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे दुष्काळी भागातून आलेल्या बहिण भावाचा पाण्यात बुडून मृत्यु झाल्याची घटना दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) वडगाव कॅनॉललगत वडगाव बु. पुणे येथे बहिण भाऊ पोहण्यासाठी गेली असता त्या पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला आहे. तथापि, मृत बहिण भाऊ दुष्काळी भागातून आलेली नव्हती.
(२) मृत मुले उन्हाळ्याच्या सुट्टीत आजीकडे आलेली होती. दुपारच्या वेळी मुले दिसून न आल्याने मुलांचे अपहरण झाल्याबाबतची तक्रार सिंहगड रोड पोलीस ठाणे येथे दि.०४.०५.२०१६ रोजी गु.र.न.१६५/२०१६ देण्यात आली होती. मृत मुले ही कॅनॉलच्या पाण्यात अंघोळीसाठी / पोहण्यासाठी गेली असता व त्यांना पोहता येत नसल्याने पाण्यात वाहत जाउुन वानवडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये त्यांचे देह आढळून आले. या मुलांना उपचारासाठी कमांड हॉस्पीटल, वानवडी,पुणे येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळगांव (जि.अहमदनगर) शिवारात नगर-दौड मार्गावर ट्रक व टेम्पो यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघाताबाबत**

**(२४) ५६५३० (२४-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगांव (जि.अहमदनगर) शिवारात नगर-दौड मार्गावर ट्रक व टेम्पो यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात तीन जण ठार तर ७ जण गंभीर व दोघांची प्रकृती चिंताजनक असून २३ मेंढ्या ठार झाल्याची घटना दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) पांढरेवाडी कोळगांव शिवारात (नगर-दौंड रोड, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) ट्रक व टेम्पो यांच्यात धडक होऊन दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या अपघातात तीन जण ठार, ७ जण जखमी व २३ मेंढया ठार झाल्या होत्या.

७ जखमींपैकी एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यु झाल्याने या अपघातात एकूण ४ व्यक्ती ठार झाल्या आहेत.

(२) सदर अपघाताबाबत दिनांक २३.०४.२०१६ रोजी गु.र.क्र. ४९/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रकचालकास (जिल्हा राजनांदगांव, राज्य छत्तीसगड) दिनांक ३०.०४.२०१६ रोजी अटक करण्यात आलेली आहे. मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरामध्ये लहान मुले चोरणारी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याबाबत**

**(२५) ५८३२४ (२५-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये लहान मुले चोरणारी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोळीने नागपाडा येथून दोन मुली व एका मुलाचे अपहरण करण्यात आले असून अपहरण करण्यात आलेल्या लहान मुलांपैकी दोन मुलींची वाराणसी येथून सुटका करण्यात आली आली असून एका मुलाची अद्यापही सुटका करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मुलाची सुटका करणेबाबत तसेच आंतरराज्यीय टोळीला अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अशी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) व (३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात नागपाडा पोलीस ठाणे हद्दीतून दिनांक २४.०४.१६ रोजी ९७/आय, नयानगर, शेड नं.२, मोरलॅन्ड रोड, नागपाडा, मुंबई येथून ३ मुलांचे अज्ञात इसमांनी अपहरण केले होते. याबाबत नागपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३८/२०१६ भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यात अपहरण झालेल्या ३ मुलांपैकी २ मुली वाराणसी येथे बेवारस स्थितीत मिळून आल्या असून, एका अपहरण झालेल्या मुलाचा सर्वतोपरी शोध घेण्याचे प्रयत्न चालु आहेत. सदर गुन्ह्यात कोणतीही आंतरराज्यीय टोळी सामील असल्याबाबत अद्यापर्यंतच्या तपासात निष्पन्न झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील अंधेरी (प) येथील जुहू चर्च रोड, गांधीग्राम रोड व मिलेक्ट्री रोड येथे रहादारीतल्या वाहनांचा खोळंबा होत असल्याबाबत

**(२६) ५८४५१ (२३-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (प) येथील जुहू चर्च रोड, गांधीग्राम रोड व मिलेक्ट्री रोड येथे वाहनांच्या रहदारीत मोठ्या प्रमाणात खोळंबा होत असल्याच्या तक्रारी सांताक्रूझ वाहतूक विभाग व अंधेरी आरटीओ यांना दिल्या असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारींवर संबंधित विभागांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) गांधीग्राम रोड, जुहू चर्च रोड, मिलीटरी रोड परिसरात वाहतूकीची कोडी होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी व काही संस्थांची निवेदने प्राप्त झाली आहे.
(२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१) गांधीग्राम रोड, जे.बी. जुकर मार्ग व इस्कॉन मंदिर परिसरात वाहने पार्किंग होत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगर पालिकेस पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन “नो पार्किंग” चे २० नविन बोर्ड लावण्यात आलेले आहे.

२) सदर परिसरात सकाळी व सायंकाळी महत्वाचे जंक्शनवर पोलीस अमंलदार नेमण्यात येवून रायडर मार्फत गस्त घालण्यात येते व नो पार्किंग व वाहतूकीस अडथळा करणारी वाहने तात्काळ सदर ठिकाणाहून हलवून वाहतूक सुरळीत करण्यात येते.

३) संबंधित वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी संबंधीत परिसरात गस्तीचे वेळी वाहतूकीस अडथळा करणारी वाहने अथवा नो पार्किंग झोनमध्ये वाहने आढळून आल्यास "पी.ए." सिस्टीमवर वाहन चालकांना तात्काळ वाहन हटविण्याबाबत सूचना देतात.

४) माहे जानेवारी २०१६ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत सदर परिसरात "नो पार्किंग" ठिकाणी व वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ५७२ वाहन चालकांविरुध्द मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

५) सदर परिसरातील सोसायटी पदाधिकारी व जनतेशी वाहतूक अधिकारी हे वेळोवेळी संपर्कात राहून मिटींग घेवून त्यांच्याशी चर्चा करुन वाहतूक कोंडीबाबतच्या समस्यांचे निरसन केले जाते. तसेच परिसरातील प्रतिस्टित नागरिकांना स्थानिक वाहतुक सल्लागार समितीचे सदस्य म्हणुन सामावून घेवून वाहतूक समस्यांचे निराकरण करण्यात येते.

६) सद्या वाहतूक विभागात कार्यरत असणाऱ्या खाजगी क्रेन्स मा. उच्च न्यायालय यांनी सन २००६ पासून दिलेल्या निर्देशानुसार भाडेतत्वावर कार्यरत आहेत. परंतु नविन अत्याधुनिक वाहनांची संख्या मुंबईमध्ये सातत्याने वाढत आहे. उपरोक्त प्रकारच्या खाजगी क्रेन्स सदरची महागडी व अत्याधुनिक वाहने उचलण्यास असमर्थ आहेत. सबब मुंबई वाहतूक पोलीस दलाने अशा वाहनांकरिता तसेच इतरही वाहनांकरीता अत्याधुनिक क्रेन्स घेण्याबाबत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगिर (लातूर) येथे नवीन पोलीस वसाहत निर्माण करण्याबाबत**

**(२७) ५८५८७ (२३-०८-२०१६). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) शहर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या पोलीस वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाली असून अर्धे अधिक पोलीस, वसाहती ऐवजी भाड्याच्या घरात राहतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अति संवेदनशील असलेल्या उदगीर शहरातील परिस्थिती लक्षात घेता पोलीसांसाठी नवीन पोलीस वसाहत निर्माण करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१६ मध्ये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१), (२) व (३) उदगीर जि.लातूर येथील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी नवीन निवासस्थानाचे बांधकामाबाबत महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांना सूचना देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळबोली (ता.पनवेल, जि.रायगड) वसाहतीमध्ये अवजड वाहनांना बंदी अंसतानाही बेकायदेशीररित्या पार्कींग होत असल्याबाबत**

**(२८) ५८८३० (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) वसाहतीमध्ये अवजड वाहनांना बंदी असताना सुद्धा बेकायदेशीररित्या पार्कींग व वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होवून सुरक्षा धोक्यात आली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरिकांनी याबाबत वारंवार तक्रार करूनही संबंधित वाहतुक पोलिस दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) कळंबोली वसाहतीत अवजड वाहनांमुळे झालेल्या अपघाताचे गुन्हे खालीलप्रमाणे आहेत.

| वर्ष | अपघात | जखमी | गंभीर | मयत |
|---|---|---|---|---|
| २०१३ | -- | -- | -- | -- |
| २०१४ | १ | -- | -- | १ |
| २०१५ | -- | -- | -- | -- |
| जून, २०१६ | १ | २ | -- | -- |

वर नमूद गुन्हयांव्यतिरिक्त कळंबोली वसाहतीत इतर वाहनांमुळे झालेली अपघातांची माहिती

| वर्ष | अपघात | जखमी | गंभीर | मयत |
|---|---|---|---|---|
| २०१३ | ३ | २ | -- | १ |
| २०१४ | ६ | ५ | -- | ३ |
| २०१५ | ५ | ८ | -- | -- |
| जून, २०१६ | ३ | २ | -- | १ |

(२) व (३) कळंबोली वाहतूक शाखेच्या हददीत कळंबोली वसाहतीमध्ये जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी असल्याबाबत दि.१२.१२.२००२ रोजी अधिसूचना निर्गमीत करण्यांत आलेली आहे. कळंबोली वसाहतीमध्ये प्रवेश करणाऱ्या रस्त्याच्या सुरुवातीस हाईट गेज बसविण्यात आलेले आहेत. पैकी चार रस्त्यांवरील हाईट गेज नादुरुस्त झाल्यामुळे ते दुरुस्त करण्याबाबत सिडको कडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

कळंबोली वाहतूक शाखा हददीतील अवजड वाहनांवर मोटार वाहन कायद्यातील कलमान्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

| वर्ष | अपघात | गंभीर | मयत | केसेस | दंड (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| २०१३ | -- | -- | -- | ८३६ | ९७,३०० |
| २०१४ | १ | -- | १ | ८७८ | १,२८,६०० |
| २०१५ | -- | -- | -- | ७१७ | ९९,१०० |
| जून, २०१६ | १ | -- | -- | ४७७ | ७३,८३० |

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**बुलढाणा शहरातील विस्कळीत वाहतूक व्यवस्थेबाबत**

**(२९) ५९३८५ (२४-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील वाहतूक नियंत्रण व्यवस्था गत दहा ते बारा वर्षांपासून बंद असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यंत्रणा बंद असल्यामुळे बुलडाणा शहरातील मुख्य रस्ते व राज्य मार्गावरील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्ग क्रमांक सहा वर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असुरक्षीतता निर्माण झाल्याची तक्रार नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने कोणत्या उपाय योजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) होय.

सन २००१ मध्ये बुलढाणा शहरात वाहतूक नियंत्रण व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली होती. परंतु थोडयाच कालावधीत सदर यंत्रणा बंद पडली. यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता तसेच रस्तेदुरुस्ती, दिशादर्शक फलक लावणे, वाहतूक पॉईंट, सिग्नल यंत्रणा, स्टॉप लाईन, गतिरोधक टाकणे, पांढरे पटटे, झेब्रा क्रॉसिंग, साईड पार्किंग इ. बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद, म.रा.रस्ते विकास महामंडळ इ. यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

(२) नाही.

वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी बुलडाणा शहराच्या महत्वाच्या ठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी, चौकाचौकात तसेच राज्य महामार्गावर वाहतूक पोलीस बंदोबस्त नियमित लावण्यात येतो. तसेच ठिकठिकाणी सूचनाफलक लावण्यात आलेले असून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत.

(३) पोलीस विभागाकडे अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-अहमदाबाद महामार्गावर लागून असलेल्या चारोटी नाक्याजवळील पुलावर अवजड वाहनांची पार्किग होत असल्याबाबत**

**(३०) ६००५२ (२४-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर लागून असलेल्या चारोटी नाक्याजवळील गुलजारी नदीवरील पुलावर दोनही बाजुने बेकायदेशीररित्या अवजड वाहनांची पार्किंग होत असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अवजड वाहनांची बेकायदा पार्किंग तात्काळ हटविण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चारोटी नाक्यावरील गुलजारी नदीच्या पुलावर बेकायदेशीररित्या अवजड वाहनांची पार्किंग होत असल्याचे आढळून आले नाही. तसेच या ठिकाणी पार्किंग केल्यामुळे अपघात घडल्याचेही निदर्शनास आले नाही.

(२) व (३) सदर ठिकाणी सध्या पुलाचे बांधकाम सुरु आहे. त्यामुळे वाहनकोंडी होऊ नये याकरीता कर्मचारी नेमले आहेत तसेच सुरक्षेसाठी रस्त्याच्या कडेला आवश्यकतेनुसार क्रॅश बॅरीअर बसविण्यांत येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यात बेकायदा शस्त्रांची तस्करी वाढल्याबाबत**

**(३१) ६२९१७ (२३-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात माहे मे-जून, २०१६ मध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा शस्रांची तस्करी वाढल्याचे निदर्शनास आले असून पोलिसांनी अनेक ठिकाणी धाडी टाकून बेकायदा गावठीकट्टा, पिस्तूल तसेच रिव्हॉलव्हर सारखी घातक शस्त्रे हस्तगत केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शस्त्रांच्या तस्करीमुळेच जिल्ह्यामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून यामध्ये आंतरराज्यीय टोळीचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) सांगली जिल्ह्यात माहे मे-जून, २०१६ मध्ये पोलीसांनी अनेक ठिकाणी धाडी टाकून एकूण १५ बेकायदा अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांची सखोल चौकशी चालू आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरात जेष्ठ महिलांची पेन्शन, निराधार योजनेतून पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(३२) ६५२१८ (१३-०२-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात जेष्ठ गरजू महिलांना पेन्शन, निराधार योजनेतून पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक झाल्या प्रकरणी चावडी (सोलापूर) पोलिसांत फसवणूक झालेल्या महिलांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

सदर प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे १) गु.र.नं.-१०८/१४, २) गु.र.नं.-१२४/१४, ३) गु.र.नं.-२६९/१४ ४) गु.र.नं.-४५६/१५ ५) गु.र.नं.-४०२/१६ तसेच जेलरोड पोलीस ठाणे येथे १) ८२/१६ असे एकूण ६ गुन्हे दाखल आहेत.

यातील गु.र.नं.-२६९/१४ व ४५६/१५ मध्ये आरोपी अज्ञान असून गुन्ह्यांची ‘अ’ वर्गात वर्गवारी करण्यात आलेली आहे. उर्वरित ४ गुन्हयांमध्ये एकच आरोपी असून त्यास अटक करण्यात आलेली आहे. गु.र.नं. १०८/१४, व १२४/१४ मध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. गु.र.नं.-४०२/१६ मध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तर गु.र.न.-८५/१६ पोलीस तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) मतदार संघातील अवैध धंदे बंद करण्याबाबत**

**(३३) ६६५७६ (०७-०२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) मतदार संघातील वरली, मटका, जुगार, क्लब, गुटखा, अवैध दारु ह्यासारखे सर्व अवैध धंदे बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या सुमारास प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनंतरही पोलीस प्रशासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) मा.आमदार श्री.डॉ.शशिकांत खेडेकर, सदस्य सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघ, यांनी दिनांक १७.०८.२०१६ रोजी मतदार संघात दौऱ्यादरम्यान पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी किनगांवराजा यांना मतदार संघात चोरुन लपून चालणाऱ्या अवैध दारु विक्रेत्यावर, अवैध धंदेवाल्यांवर कारवाई करावी अशा सुचना दिल्या होत्या.

पोलीस अधीक्षक कार्यालय व स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांचे अभिलेखाची पाहणी केली असता सदर ठिकाण तसेच सिंदखेडराजा मतदार संघातील ०६ पोलीस स्टेशन पैकी किनगांवराजा वगळता इतर पोलीस स्टेशनला स्थानिक लोकप्रतिनिधी कडून नमूद केल्याप्रमाणे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) बुलढाणा जिल्हयात कोठेही अवैध धंदे सुरु नसून चोरुन लपून अवैध धंदे करणारे इसमांवर वेळीच कारवाई करण्यात येते.

सन २०१६ मधे सिंदखेडराजा मतदारसंघातील देऊळगांवराजा, सिंदखेडराजा, किनगांवराजा, अढेरा, साखरखेर्डा, बिबी या सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत जुगाराच्या एकूण ८७ गुन्हयांमध्ये २०२ आरोपींवर गुन्हे दाखल झाले असून ३,३०,८३०/- रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध दारु विक्रीच्या एकूण ३५७ गुन्हयांमध्ये ३५८ आरोपींवर गुन्हे दाखल झाले असून ३,५१,०१०/- रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अपहरणांच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(३४) ६६५८३ (०७-०२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५ मध्ये ८ हजार २५५ अपहरणांच्या गुन्ह्यांची नोंद असल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नोंदविल्या गेलेल्या गंभीर गुन्ह्यामध्ये प्रत्येक चौथा गुन्हा हा अपहरणाचा असल्याचे सदर अहवालात स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग अहवाल-२०१५ अन्वये सन २०१५ मध्ये IPC अंतर्गत दखलपात्र गुन्ह्यांची एकूण संख्या २,७५,४१४ असून त्यापैकी अपहरणाच्या गुन्ह्यांची संख्या ही ८,२५५ इतकी आहे.

(२) बचपन बचाओ या NGO संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे सर्व हरविलेल्या मुलांची प्रकरणे ही अपहरणांच्या गुन्ह्यात दाखल करावी असे आदेश दिलेले असल्याने गुन्ह्यांच्या दाखल संख्येत वाढ झालेली आहे.

(३) महाराष्ट्र राज्यांमध्ये अपहरणांची प्रकरणे शोधून काढण्यात देशात प्रथम क्रमांकावर आहे. सांख्यिकी माहितीप्रमाणे ५७५१ पैकी ३२६५ शोधुन काढलेली आहेत.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागात दि.३१/३/२००८ रोजी अनैतिक वाहतूक प्रतिबंध समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

विशेष पोलीस महानिरिक्षक, नागरी हक्क सुरक्षा यांना अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध संदर्भात राज्याचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

राज्यात मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नवी मुंबई, सोलापूर, यवतमाळ, बीड, अहमदनगर, कोल्हापूर, ठाणे ग्रामीण व सांगली या १२ घटकामध्ये स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. सदर कक्षांनी स्थापनेपासून माहे डिसेंबर २०१६ अखेर १७७३ बळींच्या सुटकेच्या धाडी टाकून ७३११ बळीत महिला व मुलींची सुटका करण्यात आलेली आहे तसेच ४७६० अनैतिक मानवी वाहतुक करणाऱ्या आरोपींना (वाहतूकदार) अटक करण्यात आलेली आहे.

लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिलांची सुटका, पूनर्वसन आणि पुर्नएकात्मिक करण्यासंदर्भातील बाबींचे समन्वय करण्याकरिता अपर मुख्य सचिव, गृह यांचे अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रातील ४६ पोलीस घटकामध्ये ऑपरेशन मुस्कान अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी आतापर्यंत एकूण ४ ऑपरेशन मुस्कान अभियान राबविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी येथील यशोधर नगरामध्ये अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(३५) ७०५८४ (१७-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील यशोधर नगरामध्ये असलेल्या महिला रक्षण व संवर्धन केंद्राच्या जुन्या इमारतीच्या आवारात अनेक अवैध धंदे चालत असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त तसेच संबंधित अधिका-यांकडे गत ६ महिन्याच्या काळात अनेक वेळा करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी परभणी जिल्ह्यातील पोलीस घटकाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

सदर प्रकरणाची खात्री करण्याकरिता चौकशी केली असता त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे अवैध धंदे चालत नसल्याचे आढळून आले आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे विकासकाने अनधिकृत इमारतींचे बांधकाम केल्याबाबत**

**(३६) ७२१८६ (१६-०१-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे अनधिकृत इमारतींचे बांधकाम केल्याप्रकरणी विकासक व जमीन मालकासह सहा जणांवर प्रभाग समिती ५ चे सहायक आयुक्त यांनी निजामपूर शहर पोलिस स्टेशनमध्ये माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत विकासक श्री.दानिश रशिद आबूजी यांना अनेकवेळा नोटीस देऊनही त्यांनी अनधिकृत बांधकाम केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी निजामपुर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७३/२०१६, एम.आर.टी.पी. कायद्याच्या कलम ५२ प्रमाणे ६ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरगांव मंजू (ता.जि.अकोला) येथे दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये पोलीसांनी मंडळातील कार्यकर्त्यांना मारहाण केल्याबाबत**

**(३७) ७२५२५ (११-०१-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव मंजू (ता.जि.अकोला) येथे दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये पोलीसांनी मंडळातील कार्यकर्त्यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळातील कार्यकर्त्यांनी मारहाण करणाऱ्या पोलीसांवर कारवाईची मागणी केली असता गावातील ५० पेक्षा जास्त नागरिक, लहान मुले व महिलांना पोलीसांनी अमानुष मारहाण केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी पोलीसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१८) :** (१) दिनांक १२.१०.२०१६ रोजी अकोला जिल्ह्यातील पोलीस स्टेशन बोरगांव मंजु परिसरात बोरगांव टाऊन येथे दुर्गा विसर्जन मिरवणूक सुरू संवेदनशील ठिकाणी फरशी चौक मश्जीद येथे रेणुका माता नवदुर्गा मंडळाचे अध्यक्ष यांनी हिंदु-मुस्लीम समाजामध्ये तेढ निर्माण होईल असे वादग्रस्त गाणे लावले होते. सदर गाणे बंद करण्यास सांगितले असता मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी गाणे बंद न करता मुस्लीम विरोधी घोषणा दिल्यामुळे तेथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली .सबब, परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून कर्तव्यावर हजर असलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी धामधुम करणाऱ्या लोकांवर सौम्य बळाचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

(२) मंडळातील कार्यकर्त्यांनी मारहाण करणाऱ्या पोलीसांवर कारवाईची मागणी केली असता गावातील ५० पेक्षा जास्त नागरिक, लहान मुले व महिलांना पोलीसांनी मारहाण केली हे खरे नाही. तथापि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केलेल्या सौम्य बळाच्या वापरामध्ये ८ नागरीक किरकोळ जखमी झाले आहेत.

(३) सदर घटनेतील दोषी पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांची पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या आदेशान्वये नियंत्रण कक्ष अकोला येथे बदली करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रात शस्त्रास्त्र तस्करी सुरु असल्याबाबत**

**(३८) ७३०९० (१६-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: कोल्हापूर, सांगली व साताऱ्यामधील सीमावर्ती भागामध्ये शस्त्रास्त्र तस्करी उघडपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या दीड वर्षाच्या काळात कोल्हापूर परिक्षेत्राअंतर्गत केलेल्या कारवाईत १३५ हून अधिक देशी-विदेशी बनावटीच्या आधुनिक शस्त्रांचा साठा हस्तगत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध तस्करीमुळे शस्त्रास्त्र बाळगण्याच्या प्रमाणामध्ये वाढ झाल्याने गुन्हेगारीमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर परिक्षेत्रातील घटक जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत वेगवेगळ्या कारवाई मध्ये एकूण १८२ बेकायदेशीर अग्निशस्त्रे व दारुगोळा जप्त केला आहे. सदरची आकडेवारी पुढील प्रमाणे :-

१) कोल्हापूर जिल्हा - ७ पिस्तोल, बारा बोर ४, देशी बनावटीचे कट्टे ५, १ गन अशी एकूण १७ अग्निशस्त्रे हस्तगत केली असून आर्म्स ॲक्ट प्रमाणे एकूण १७ गुन्हे दाखल आहेत.

२) सांगली जिल्हा - गावठी कट्टे ११, गावठी पिस्तुले १९, विदेशी बनावटीचे पिस्तुल १ अशी एकूण ३१ अग्निशस्त्रे हस्तगत केली असून आर्म्स ॲक्ट ४, २५ प्रमाणे एकूण २६ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ४६ आरोपींना अटक केले आहे.

३) सातारा जिल्हा - १५ रिव्हॉल्वर/पिस्तुल, ५ गावठी कट्टे, १ डबल बॅरल बंदुक अशी एकूण २१ अग्निशस्त्रे हस्तगत केली असून एकूण १९ गुन्हे दाखल आहेत.

४) सोलापूर ग्रामीण - गावठी पिस्तुल ४, गावठी कट्टे ३, देशी-विदेशी बनावटीचे पिस्तुल ७, चायना मेड रिव्हॉल्वर १ अशी एकूण १५ अग्निशस्त्रे हस्तगत केली असून एकूण ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३६ आरोपींना अटक केले आहे.

५) पुणे ग्रामीण - एकूण ९८ शस्त्रे जप्त करण्यात आली असून एकूण ८९ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३२३ आरोपींना अटक केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जमिनीच्या व्यवहारात गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(३९) ७४१२७ (२०-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जमीन अकृषीक (एनए) करण्यासाठी प्रती चौरस फूटामागे जिल्हाधिकाऱ्यांना ७ रुपये, निवासी जिल्हाधिकाऱ्यांना ३ रुपये, तहसीलदारांना २ रुपये व कारकूनास १ रुपया असे दरपत्रक अर्जदाराच्या हातात देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार लाचलुचपत खात्याकडे अर्जदारांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सर्वे नं. १४२/२ या जमीनीची विनिश्चीतीकरण करण्याचे काम करून देण्यासाठी अतुल नाईक, अव्वल कारकुन जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी जिल्हाधिकारी यांचे कॅल्कुलेटर वर मांडणी करुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने श्री.नाईक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमातील प्रचलीत तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### भूम (जि.उस्मानाबाद) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४०) ८३५०२ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम (जि.उस्मानाबाद) येथील पोलीस निवासस्थानाची अत्यंत दुरवस्था झालेली असून सदर निवासस्थानामध्ये वीजेच्या तारांचे अस्ताव्यस्त जाळे व प्रचंड घाण पसरली असून सदर निवासस्थान राहण्यास योग्य नसल्यामुळे भूम पोलीस स्टेशनअंतर्गत ४६ पोलीस कर्मचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पोलीस निवासस्थानाच्या दुरुस्तीबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) पोलीस ठाणे, भूम येथे ३९ पोलीस कर्मचारी संख्या मंजूर असून सन १९९० मध्ये बांधण्यात आलेली १९ निवासस्थाने राहण्यास अयोग्य आहेत.
(२) होय.
(३) पोलीस ठाणे, भूमची नवीन प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक माहितीची पूर्तता क्षेत्रीय स्तरावरून झाल्यानंतर पुढील कार्यवाही पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेमार्फत करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील सातपुडा को ऑप क्रेडिट, सोसायटीने परिसरातील आदिवासी लोकांची फसवणुक केल्याबाबत**

**(४१) ८४७८१ (११-१०-२०१७). अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील सातपुडा को.ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी, शॉप नं ३, सोनल अपार्टमेंट, दीनदयाल नगर, वसई (प.) या क्रेडिट सोसायटीने परिसरातील हजारो गरीब आदिवासींना सभासद करून त्यांच्याकडून सुमारे ३८ लाख रूपयांच्या वर बचत/ ठेवी/पैसा गोळा केला व ह्या सर्व ठेवी/पैसा घेवून क्रेडिट सोसायटी चे पदाधिकारी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान फरार झालेली प्रकरणी पिडित सभासदांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास माणिकपुर पोलीस ठाणे येथे लेखी स्वरुपात तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपुडा को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीचे नोंदणीकृत कार्यालय माणिकपुर येथे असल्याची बाब दुर्लक्षित करून सदरील पोलीस ठाणेचे अमंलदार हे कार्यक्षेत्राबाहेरील असल्याचे सांगून गरीब आदिवासींच्या तक्रारी नोंदवून घेत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणी चौकशी करून कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) श्री.बाबु चौधरी रा.दादरा नगर हवेली यांनी दि.२६.८.२०१६ रोजी याबाबत माणिकपुर पोलीस ठाणे येथे लेखी स्वरुपात तक्रारी अर्ज दिला आहे.

(२) व (३) सदर पतपेढी नोंदणीकृत असून अर्जदार यांनी माणिकपुर पोलीस ठाणे जि.पालघर येथे अर्ज देण्यापूर्वी पासून बंद अवस्थेत आहे. यातील अर्जदार व साक्षीदार यांनी या पतसंस्थेच्या उपाध्यक्ष यांच्या घरी पैसे दिलेले आहेत. सदर प्रकार हा दादरा नगर हवेली सिल्वासा येथे घडलेला असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे अर्जदार यांना संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन दाद मागण्याकरीता लेखी समजपत्र दिलेले आहे. तसेच, अर्जदार यांनी माणिकपुर पोलीस स्टेशनला तक्रार करण्यापूर्वी दादरा नगर हवेली, सिल्वासा येथील पोलीस स्टेशनला सुध्दा तक्रार दिलेली आहे.

सदर प्रकरणी संबंधित पोलीस ठाणे अंमलदार यांनी अर्जदार व साक्षीदार यांचे जबाब नोंदविलेले आहेत. तरी, पिडित आदीवासी यांची तक्रार नोंदवून घेण्यात कोणत्याही प्रकारची हयगय अथवा दुर्लक्ष केलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

**मुंबईसह राज्यातील अनेक पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(४२) ८५९५५ (०४-०९-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असून तेथे पोलीस कुटूंबियांचे जीव धोक्यात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या पोलीस वसाहतींतील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबईतील पोलीस निवासी व अनिवासी इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात एकूण सुमारे रु.५८.६५ कोटी व सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात एकूण सुमारे रु.२२.८६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

राज्यातील इतर पोलीस वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीकरिता सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात एकूण सुमारे □२४७.०५ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात एकूण सुमारे रु.५६.९९ कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचपोकळी (मुंबई) येथील पोलीस खात्याच्या मध्य प्रादेशिक विभागाच्या जागेवर अत्याधुनिक मुख्यालय उभारण्याबाबत**

**(४३) ८६६०२ (०४-०९-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपोकळी (मुंबई) येथील पोलीस खात्याच्या मध्य प्रादेशिक विभागाच्या जागेची नवे अत्याधुनिक मुख्यालय उभारण्याकरीता निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर २५ मजली इमारत बांधुन इमारतीतील ८ मजले महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाच्या (एटीएस) कार्यालयासाठी कायमस्वरुपी देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा आराखडा मुंबई पोलीस आयुक्तांच्या मान्यतेसाठी गृहविभागाने पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू इमारत बांधण्याकरीता अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर जागेवर १८ मजल्यांची इमारत बांधण्याचे प्रस्तावीत असून ०७ मजले दहशतवाद विरोधी पथकाच्या कार्यालयासाठी देण्याचे नियोजन आहे.
(३) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांनी याबाबतचा आराखडा पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून त्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) सदर बांधकामाच्या आराखड्यास महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्याकडून मान्यता देण्यात आली असून सदर इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वाई (जि.सातारा) येथील नगराध्यक्षा व त्यांचे पती यांनी ठेकेदाराकडून लाच घेतल्याबाबत

**(४४) ८६६७४ (०४-०९-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाई (जि.सातारा) येथील नगराध्यक्षा व त्यांचे पती यांनी दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास ठेकेदाराकडून लाच घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने सदर दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय, दिनांक ०९.०६.२०१७ रोजी वाई येथील नगराध्यक्षा यांनी शौचालयाच्या बांधकामाचे उर्वरित बील ठेकेदारास मंजूर करण्यासाठी लाचेची मागणी करून त्यांच्या पती मार्फत लाच स्विकारली असल्याने त्यांना व त्यांच्या पती विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील प्रचलीत तरतुदी नुसार गुन्हा नोंद करून अटक केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करून न्यायालयात दोषारोप दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### बुलढाणा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशन इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४५) ८६९३३ (०४-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशनची इमारत जीर्ण झाली असल्यामुळे दिनांक ०३ जून, २०१७ रोजीच्या पावसाने या इमारतीत पाणी शिरल्याची बाब दिनांक ४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकरीता व पोलीस स्टेशनसाठी नविन इमारत मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) नाही.
सदर कार्यालयावरील कौले फुटल्यामुळे काही प्रमाणात पावसाचे पाणी गळाले आहे.
(२) व (३) सदर पोलीस उपविभागीय कार्यालय व पोलीस ठाणे इमारत व ३०० पोलीस कर्मचारी निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याबाबतच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता कैद्यांना बंदिस्त ठेवण्यासाठी असलेली कारागृहे अपुरी पडत असल्याबाबत

**(४६) ८९६२८ (०४-०९-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता कैद्यांना बंदिस्त ठेवण्यासाठी असलेली कारागृहे अपुरी पडत असल्याने राज्यातील मुख्य कारागृह, जिल्हा कारागृह तसेच इतर छोटी कारागृहे यामध्ये कारागृहाच्या क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई व ठाणे येथील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा दुपटीने कैदी असल्याने कारागृह प्रशासनावर मोठ्या प्रमाणात भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रायगड जिल्ह्याचे मुख्यालय अलिबाग येथे असलेल्या कारागृहाची क्षमता ८२ कैदी इतकी असतांना कारागृहात १४९ कैद्यांचा समावेश केल्याने कारागृहाची जागा अपूरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आकडेवारी पहाता राज्यातील बहुतांश कारागृहांवर पडणारा ताण हलका करण्याच्यादृष्टीने शासनाकडून अद्यापही कोणतीही उपाययोजना करण्यात
आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) क्षमतेपेक्षा जास्त असलेल्या कारागृहातील बंद्यांची गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेली उपाययोजना :-

१) कारागृहामधील न्यायाधीन बंदीने तो दाखल असलेल्या गुन्हयामध्ये जास्तीत जास्त शिक्षेच्या अर्ध्यापेक्षा जास्त कालावधी कारागृहात व्यतित केला असल्यास (सीआरपीसी-४३६(अ) नुसार) अशाप्रकारची प्रकरणे संबंधित न्यायालयाच्या निदर्शनास आणली जातात.

२) सर्व कारागृहामध्ये संबंधित सत्र न्यायाधिश महिन्यातून एकदा भेट देऊन न्यायाधीन बंद्यांचा आढावा घेतात, तसेच तीन महिन्यातून एकदा कारागृह अभिविक्षक मंडळाची बैठक जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येते.

३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समिती स्थापन करुन सदर समितीसमोर (सीआरपीसी-४३६(अ) अंतर्गत दाखल न्यायाधीन बंद्यांची प्रकरणे व इतर ९ विविध प्रवर्गातील बंद्यांची प्रकरणे सादर करण्यात येत आहेत.

४) कारागृहात दाखल न्यायाधीन बंद्यांना ज्यांच्या जामीनाच्या हक्काबाबत मार्गदर्शन करण्यात येत असून, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडील पॅनलवरील वकीलांची जामीन/जामीन रक्कम कमी करणे इ. करीता नेमणूक करुन कायदेशीर मत घेण्यात येते. तसेच, प्ली बार्गेनिंग शिबीरे आयोजित करण्यात येत आहेत.

५) क्षमतेपेक्षा जास्त बंदी असलेल्या कारागृहातील न्यायाधीन बंद्यांना संबंधित न्यायालयाची परवानगी घेऊन नजीकच्या कारागृहात वर्ग करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

६) सन २०१३-१४ मध्ये ५ खुले कारागृह, सन २०१४-१५ मध्ये १ खुले कारागृह व ०१ महिला खुले कारागृह तसेच २०१५-१६ मध्ये गचिरोली येथे खुले कारागृह कार्यान्वित करण्यात आले आहे.

७) सन २०१३-१४ मध्ये जालना, नंदूरबार, वाशिम व सिंधुदूर्ग कारागृहाची निर्मिती करण्यात आली आहे.

८) मुंबई, येरवडा, औरंगाबाद, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे अतिरिक्त बॅरेक्सचे बांधकामासंदर्भात कारवाई सुरु आहे.

९) व्हिडीओ कॉन्फरन्सींगचा प्रभावि वापर करण्यात येत असून, व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे केसची सुनावणी करण्यासंदर्भात संबंधित न्यायालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

१०) राज्यात अद्यावत कारागृह तयार करण्याच्या अनुषंगाने अभ्यास व त्यावरील उपाययोजना सुचविण्यासाठी दि. ०६.०६.२०१७ रोजी से.नि. न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत लोढा बिल्डरने आपल्या प्रकल्पाच्या जाहिरातीकरीता संवेदनशील असलेल्या राजभवनाचा फोटो बेकायदेशीररित्या वापरल्याबाबत**

**(४७) ८९६७६ (०४-०९-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत लोढा बिल्डरने आपल्या प्रकल्पाच्या जाहिरातीकरीता सुरक्षेसाठी संवेदनशील असलेल्या राजभवनाचा फोटो बेकायदेशीररित्या वापरल्याचे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित बिल्डरवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०१७) :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही पोलीस ठाण्यात बिल्डरने त्यांच्या प्रकल्पाच्या जाहिरातीकरिता सुरक्षेसाठी संवेदनशील असलेल्या राजभवनाचा फोटो बेकायदेशीररित्या वापरल्याबाबत गुन्हा नोंद नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) पोलीस ठाणेच्या इमारतीचे बांधकाम प्रशासकीय मान्यता मिळूनही सुरु करण्यात आले नसल्याबाबत**

**(४८) ९०५४० (०४-०९-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) पोलीस ठाणेच्या नवीन इमारत बांधकामासाठी दिनांक १६ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार रूपये १ कोटी ९२ लाख रुपयाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता मिळूनही सदर इमारतीच्या बांधकामासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नसून पोलीस कर्मचाऱ्यांना तसेच आपल्या समस्या व तक्रारी घेवून येणाऱ्या लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाहुवाडी (जि.कोल्हापूर) पोलीस ठाणेच्या नवीन इमारत बांधकामासाठी शासनाने सदर रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१७-१८ साठी मंजूर निधीतून रक्कम उपलब्ध करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खानापूर (जि.सांगली) येथील पोलीस दूरक्षेत्र इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४९) ९१५५७ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि.सांगली) येथील पोलीस दूरक्षेत्र (आऊट पोस्टची) ची इमारत वापरण्यास योग्य नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु इमारत नव्याने बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.गृह राज्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करून सदर इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) सदर इमारत नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर इमारत नव्याने बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास निवेदन सादर केल्याचे आढळून येत नाही.
(३) व (४) सदर इमारतीसंदर्भात अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव शहरातील पोलीस मुख्यालयाच्या आवारातील निवासस्थानांच्या व पोलीस मुख्यालयाच्या नवीन इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(५०) ९३९०३ (०४-०९-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील पोलीस मुख्यालयाच्या आवारातील निवासस्थानांच्या व पोलीस मुख्यालयाच्या नवीन इमारतीच्या दुरुस्तीचे काम गत ३ वर्षात अनेकदा होऊनही निवासस्थानांची दुरवस्था झाली असून या निवासस्थानांच्या दुरुस्तीवर अवाजवी खर्च केला असतानाही तीच तीच कामे पुन्हा पुन्हा दाखवून दुरुस्ती न करता कंत्राटदारांना देयके अदा करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांच्या परिणामात्मक व गुणात्मक तपासणीसाठी विशेष पथकाची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) निवासस्थाने दुरुस्तीची कामे सुरु असून तीच तीच कामे दुरुस्त करण्यात आलेली नाहीत.
(२) दुरुस्ती केलेल्या कामाच्या परिमाणात्मक व गुणात्मक तपासणीसाठी विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.